# 'सायबर सुरक्षे'वर विद्यार्थिनींना मार्गदर्शन

**जळगाव, ता. २२ :** डॉ. अण्णासाहेब बेंडाळे महिला महाविद्यालयात कनिष्ठ महाविद्यालयातर्फे युवती सभेंतर्गत सायबर सुरक्षेवर व्याख्यान घेण्यात आले. पोलिस कर्मचारी स्वाती पाटील यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. त्यांनी सायबर गुन्हेगारीबद्दल सतर्क केले.

इंस्टाग्राम, फेसबुकवर आलेले अज्ञात व्यक्तींचे फ्रेंड रिक्वेस्ट न स्वीकारणे, टू वे स्टेप व्हेरिफिकेशन, ऑनलाइन फ्रॉड तसेच इंटरनेटच्या युगात सजकता ठेवणे गरजेचे आहे, याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने टीना पाटील आणि दर्शना चौधरी यांनी मूळ व बनावट संकेतस्थळाबाबत प्रत्यक्ष कृती करून घेतली.

या कार्यक्रमास कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एन. जी. बावस्कर अध्यक्षस्थानी होते. यावेळी युवती सभाप्रमुख प्रा. चांदणी चिरमाडे उपस्थित होत्या. प्रा. पूनम नारखेडे यांनी सूत्रसंचालन केले. तर प्रा. नीलिमा चौधरी यांनी आभार मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या. यशस्वितेसाठी युवती सभेच्या सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले.